**प्रकल्प प्रवर्तक मे. एसएमडब्ल्यू इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.बी-1/2, बी-1/3,बी-1/4,आर-2 व आर-3, एमआयडीसी देवळी,सर्व्हे नं.एसआर-46/2, 562, 564, 565, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धा, महाराष्ट्र येथे 2X1000 टन प्रती दिन आयर्न ओअर पेलेट प्लांट सोबत 26,000 घनमीटर प्रति तासाचा कोल गॅसिफायर, स्पॉन्ज आयर्न प्लांट (2 X500 टन प्रतीदिन) व 50 मेगावॅट सीपीपी(25 मेगावॅट डब्लुएचआरबी + 25 मेगावॅट एएफबीसी) वीज प्रकल्प विस्तारिकरण उत्पादन प्रकल्पाच्या उभारणीच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १८/०८/२०२३ (शुक्रवार) |
| वेळ | : | दुपारी १२.३० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ – मे. एसएमडब्ल्यू इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.बी-1/2, बी-1/3,बी-1/4,आर-2 व आर-3, एमआयडीसी देवळी,सर्व्हे नं.एसआर-46/2, 562, 564, 565, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धा महाराष्ट्र. |

**<u>प्रस्तावनाः-</u>**

प्रकल्प प्रवर्तक मे. एसएमडब्ल्यू इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.बी-1/2, बी-1/3,बी-1/4,आर-2 व आर-3, एमआयडीसी देवळी व सर्व्हे नं.एसआर-46/2, 562, 564, 565, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धा, महाराष्ट्र येथे 2X1000 टन प्रतीदिन आयर्न ओअर पेलेट प्लांट सोबत 26,000 घनमीटर प्रति तासाचा कोल गॅसिफायर स्पॉन्ज आयर्न प्लांट (2 X500 टन प्रतीदिन) व 50 मेगावॅट सीपीपी(25 मेगावॅट डब्लुएचआरबी + 25 मेगावॅट एएफबीसी) वीज प्रकल्प विस्तारिकरण उत्पादन प्रकल्पाच्या उभारणीच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील 10.0 कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर दिनांक १६/०७/२०२० व सुधारीत टीओआर दि. १६/०५/२०२३ रोजी अन्वये मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, 2006 नुसार प्रकल्प स्थानाच्या 10 कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए शेड्युल 3 (ए)- मेटार्जिकल इंडस्ट्रीज (फेरस आणि नॉन-फेरस) आणि उप संवर्ग 1 (डी) (थर्मल पॉवर) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

प्रकल्प प्रवर्तक मे. एसएमडब्ल्यू इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.बी-1/2, बी-1/3,बी-1/4,आर-2 व आर-3, एमआयडीसी देवळी,सर्व्हे नं.एसआर-46/2, 562, 564, 565, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धा, महाराष्ट्र यांनी त्यांच्या 2X1000 टन प्रतीदिन आयर्न ओअर पेलेट प्लांट सोबत 26,000 घनमीटर प्रति तासाचा कोल गॅसिफायर स्पॉन्ज आयर्न प्लांट (2 X500 टन प्रतीदिन) व 50 मेगावॅट सीपीपी(25 मेगावॅट डब्लुएचआरबी + 25 मेगावॅट एएफबीसी) वीज प्रकल्प विस्तारिकरण उत्पादन प्रकल्पाच्या उभारणीसाठी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १२/०६/२०२३ ला अर्ज सादर केला.

म.प्र.नि.मंडळ नागपूर व जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी वर्धा , महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २७/०७/२०२३ रोजी प्रत्यक्ष (physical) व ऑनलाईन पध्दतीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थळ मे. एसएमडब्ल्यू इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.बी-1/2, बी-1/3,बी-1/4,आर-2 व आर-3, एमआयडीसी देवळी,सर्व्हे नं.एसआर-46/2, 562, 564, 565, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धा, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिलेली होती. परंतु वर्धा जिल्ह्यामध्ये पाऊस परिस्थितीबाबत रेड अलर्ट घोषित करण्यात आलेला होता, त्यामुळे सदरहू जाहिर जनसुनावणी पुढे ढकलण्यात आल्याबद्दल मा. जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांच्या पत्र दिनांक २७/०७/२०२३ अन्वये घोषित करण्यात आले **(सहपत्र-१)**, तथा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सुधारित अधिसूचना दिनांक 09 मे 2022 अन्वये सदर प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी पुन्हा १८/०८/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, 2006 नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या 30 दिवस अगोदर (म्हणजे जनसुनावणी दिनांक 27-07-2023 च्या 30 दिवस अगोदर) जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर-2 म.प्र.नि.मंडळ नागपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र हितवाद, नागपूर एडिशन यात इंग्रजीत दिनांक २१/०६/२०२३ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती **(सहपत्र-२)**. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीका, टिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक नागपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर-२, यांना ०७ एवढे लेखी आक्षेप प्राप्त झालेले आहे.

त्याचप्रमाणे जनसुनावणी पुढे ढकल्यानंतर नविन जनसुनावणीच्या तारखेची जाहिर सूचना जनतेच्या माहितीसाठी परत दिनांक ०३/०८/२०२३ रोजी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर

एडिशन  यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र हितवाद, नागपूर एडिशन  यात इंग्रजीत परत प्रकाशित करण्यात आलेली होती (**सहपत्र-३**).

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – 440 001

२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, 15वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -400 032

३) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई – 400 022

४) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, 5 वा मजला,सिव्हिल लाईन्स, नागपूर

५) उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर – 2, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, 5 वा मजला,सिव्हिल लाईन्स, नागपूर

६) जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा,

८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा,

९) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, देवळी, तालुका – देवळी, जिल्हा- वर्धा,

१०) तहसीलदार, तहसील कार्यालय- देवळी, जिल्हा – वर्धा,

११) मुख्याधिकारी, नगर परिषद,  देवळी, जिल्हा - वर्धा,

१२) पंचायत समिती कार्यालय, देवळी, तालुका – देवळी, जिल्हा- वर्धा,

१३) ग्रामपंचायत कार्यालय – चिकणी / जामनी / पडेगांव / सेलसुरा/वडद/दिघी,   तालुका – देवळी, जिल्हा- वर्धा

१४) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

वरिल अनुक्रमांक 06 ते 13 वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते.  अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास  नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर, 2006 च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-५५/२०२३ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डबल्युपीसी) पीएच/बी-२३०८०८-एफटीएस-०१७० दिनांक ०८/०८/२०२३अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, वर्धा किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | अध्यक्ष |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी. | सदस्य |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | समन्वयक |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ०७ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत (**सहपत्र-४**).

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश (**सहपत्र-५ व ६**) प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. नागपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. अर्चना मोरे, अपर जिल्हादंडाधिकारी, वर्धा तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, सौ. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. नागपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात

येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की जे काही लेखी निवेदने/आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत, ते शासनास पाठविण्यात येतील. त्याचप्रमाणे उपस्थितांपैकी कोणाला जर फक्त लेखी निवेदन/आक्षेप नोंदवायचा असेल, तर ते म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीस हस्तांतरित करु शकतात. त्याची पोच देण्यात येईल. त्याचे लेखी उत्तर प्रकल्प प्रवर्तकांना संबंधित व्यक्तीस पाठविण्याची सूचना करण्यात आलेली आहे

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणेः-**

१) **श्री अनंता मधुकरराव हटवार, सरपंच, ग्रा.पं.पडेगाव, तालुका--देवळी, जिल्हा-वर्धाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सादरीकरणात सीएसआर निधी खर्चाबाबत आणि कोविड काळात 100 खाटांचे हॉस्पिटल बांधले अशी माहिती सांगितली, ती पूर्णतः खोटी आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की पहिला प्रश्न होता की कंपनीने देवळी गावात कोविड काळात कोणतेही हॉस्पिटल बांधलेले नाही. तर देवळी गावात कोविड सेंटर तात्पुरते उभारण्यात आलेले होते. कोविड झालेल्या रुग्णांसाठी विलगीकरण केंद्र (Quarantine Center) उभारण्यात आलेले होते. मा. खासदार, मा. तहसीलदार, मा. पोलिस अधिकारी तेथे उपस्थित होते व त्यांचे फोटोज व व्हिडिओ उपलब्ध आहेत. कोविड काळात नुसते हॉस्पिटलच नाही तर धर्मादाय (चॅरीटी) म्हणून ऑक्सिजन सिलेंडरसुध्दा कंपनीतर्फ पुरविण्यात आलेले होते. ते संपुर्ण जिल्ह्यात मोफत स्वरुपात उपलब्ध करण्यात आलेले होते. |
| २) | आमचे गाव प्रकल्प स्थानापासून 4.0 कि.मी. अंतरावर आहे. प्रदूषणाचा काही ना काहीतरी त्रास आम्हांला होतच असते. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | आजपर्यंत या कंपनीने आमच्या गावातील एकच कर्मचारी घेतलेला आहे. प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यासाठी कंपनीने धोरण आखणे जरुरीचे आहे. स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात यावी. | दुसरा प्रश्न स्थानिक रोजगार संदर्भात होता. तर कंपनीने प्रत्येक गावातून काहीना काही कारणांसाठी स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात आलेली आहे. जरी एखाद्या गावातील व्यक्तींना रोजगाराची संधि मिळाली नसेल, तर प्रतिक्षा यादी तपासून त्यांना नविन प्रकल्पात |

| | | |
|---|---|---|
| | | रोजगाराची संधि देण्याचा पुरेपूर प्रयत्न करण्यात येईल याचे आश्वासन देण्यात येते |
| ४) | त्याचप्रमाणे आमच्या गावासाठी सीएसआर निधी खर्च करणे आवश्यक आहे | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

२) **श्री मोहन जोशी, राहणार-देवळी, तालुका – देवळी, जिल्हा-वर्धाः-**

| अनु. क्रं. | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सादरीकरणात असे दर्शविण्यात आलेले आहे की प्रस्तावित प्रकल्पात 2,050 स्थानिक लोकांना रोजगाराची संधि प्राप्त होईल. याविषयीची स्पष्टता व त्यासाठी करावा लागणारा करार हा देवळीकरांबरोबर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय कंपनीचा एक प्रकल्प कार्यान्वित आहे, तेथे स्थानिकांना नियमानुसार रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. | नविन प्रकल्पात 2,050 लोकांना रोजगार देणार आहे, तर त्यासाठी त्याबाबत करार करता येईल काय असा प्रश्न विचारण्यात आला. तर त्याबाबत महाराष्ट्र शासनाबरोबर तसा करार असतो. मात्र त्यात स्थानिक म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असा अर्थ असून सर्व महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील लोकांचा स्थानिक या व्याख्येत समावेश होत असून फक्त देवळी किंवा वर्धा येथील रहिवाशी असा होत नाही. प्रकल्पातील एकुण रोजगाराच्या 80% रोजगार स्थानिकांना देणे बंधनकारक आहे. तरीसुध्दा आमचा प्रयत्न हा वर्ध्यातील कर्मचारी मिळविण्याचा प्रयत्न असतो, कारण तो चांगले काम करतो व टिकून राहतो. तसेच प्रस्तावित प्रकल्पात तीन संवर्गातील कर्मचा-यांची आवश्यकता आहे. ती म्हणजे कुशल (Skilled), अर्धकुशल (Semi Skilled) आणि अकुशल (Unskilled). तर ज्याची जशी शैक्षणिक पात्रता असेल, त्यानुसार जास्तीत जास्त प्रकल्प परिसरातील स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात येईल.<br>नविन प्रकल्पात यासाठी एक समन्वयक समिती गठित करण्याचा आमचा मानस असून त्याबाबत देवळी येथील प्रतिष्ठित व्यक्तींसोबत कंपनी प्रशासन चर्चा करेल नविन प्रकल्पात एक समिती गठित करणेबाबत काही सूचना असल्यास त्याबाबत चर्चा करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २) | त्याशिवाय कंपनीने जो प्रदूषणाबाबत अहवाल सादर केला, त्यामध्ये देवळी गावाचे प्रदूषणाचे सर्वेक्षण करुन प्रदूषणाच्या पातळीबाबत नोंदी अहवालात दर्शविण्यात आलेल्या नाहीत. देवळी गावापासून सहा कि.मी. अंतरावरिल प्रदूषणाची सद्यस्थिती दाखविण्यात आली परंतु देवळी ग्रामस्थांना प्रदूषणाचा त्रास किती होतो व त्यासाठी कंपनीने काय उपाय योजना केल्या याची माहिती नाही. याअगोदरही मा. तहसीलदारांना सदरहू कंपनीच्या प्रदूषणाच्या त्रासाबाबत निवेदने सादर करण्यात आलेले आहेत. मात्र कंपनीने त्याकडे सपशेल दुर्लक्ष केले. कार्यरत प्रकल्पात अस्तित्वातील चिमणी/स्टॅक उंची कमी आहे, त्यामुळे वा-याच्या दिशेनुसार त्याचा प्रदूषणाचा त्रास मोठ्या प्रमाणावर देवळीकर जनतेस होतो. | पुढील आक्षेप नोंदविण्यात आला की कार्यरत प्रकल्पातील चिमणी कमी उंचीची असल्याने प्रदूषण होते. तर सदरहू चिमणी ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पारित केलेल्या निर्देशांप्रमाणेच कार्यान्वित करणे बंधनकारक असून त्याप्रमाणेच चिमणी ही प्रकल्पात बसविण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पारित केलेला प्रकल्प सुरु करण्याची अनुमती (Consent to Establish) आणि प्रकल्प कार्यान्वित करण्याची अनुम (Consent to Operate) नुसार हवा प्रदूषण नियंत्रण व्यवस्था स्थापन करुन ती कार्यान्वित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार प्रकल्पात ती व्यवस्था कार्यान्वित आहे. ती कौशल्यपूर्ण कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. तरी याबाबत केंद्र व राज्य सरकारच्या अधिसूचित संस्था (Notified Institutes) यांचा सल्ला घेण्यात येईल. पुढील तीन महिन्यात याबाबत सर्वेक्षण करण्यात येऊन प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा अधिक कार्यक्षम राबविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. वा-याच्या दिशेनुसार कधितरी धूराची दिशा बदलू शकते. तर कंपनीचा प्रयत्न असतो की प्रदूषणाची पातळी ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा. पारित केलेल्या मानकांमध्येच असावी. |
| ३) | कंपनीने आवश्यकतेनुसार वेळोवेळी आरोग्यशिबिर आयोजित करणे गरजेचे होते. ते राबविले गेलेले नाही. तरी कंपनीने दर तीन महिन्यांनी एकदा मोफत आरोग्यशिबीर देवळीच्या जनतेसाठी राबविणे गरजेचे आहे. | आता आरोग्याबाबत तर वर्धा जिल्ह्यात सावंगी व सेवाग्राम येथे हॉस्पिटल आहे. आतापावेतो आरोग्य शिबिर आयोजित करणेबाबत मागणी करण्यात आलेली नव्हती. कंपनीतर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येते. त्याचप्रमाणे कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांसाठी बरीच आरोग्य शिबिरे कंपनीत आयोजित करण्यात आलेली आहेत. पूर्वी स्थानिक जिल्हा रुग्णालयात थंड पाणी पिण्याची सोय नव्हती तर आम्ही कुलर्स उपलब्ध करुन दिलेले होते.<br>उन्हाळ्यात कुलर्सची मागणी केली असता देवळी, पूलगाव हॉस्पिटलमध्ये कुलर्स लावण्यात आलेले |

| | | |
|---|---|---|
| | | आहेत. तसेच आर.ओ. (रिव्हर्स ऑस्मोसिस) सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच भविष्यात आरोग्यविषयक काही सुविधांची आवश्यकता असल्यास ती निश्चितपणेच पूर्ण करण्यात येईल. |
| ४) | तसेच सादरीकरणात कंपनीच्या वृक्षारोपण संदर्भात निवेदन करण्यात आलेले आहे. तर देवळी गावात कंपनीने प्रत्यक्षपणे कुठलेही वृक्षारोपण केलेले नाही. | पुढील आक्षेप होता वृक्षारोपण व वृक्ष संरक्षक (ट्री गार्ड). तर आक्षेप नोंदविण्यात आला की किती वृक्ष लागवड करण्यात आली व किती झाडांचे संवर्धन करण्यात आले. तरी आम्ही केलेल्या वृक्ष संवर्धनाची नोंद घेण्यात आलेली असून शासनाने निर्देश केलेल्या सर्व आदेशांची वेळोवेळी पूर्तता करण्यात येते. आम्ही आपली जबाबदारी म्हणून वृक्षारोपण पार पाडत असतो. तसेच प्रकल्पात सीईआर (Corporate Environment Responsibility) समिती गठित करणार असून गावातील त्याबाबत विशिष्ट मागणी असल्यास त्याबाबत पूर्तता करण्यात येईल. |
| ५) | त्यांनी पुढे सांगितले की विकासाला कोणाचाही विरोध नाही. जर कंपनी येथे नविन प्रकल्प सुरु करणार असेल, तर त्याचा देवळीकर जनतेचे निश्चितच सहकार्यच असेल. पण याचा अर्थ असा नाही की कंपनीतील प्रदूषणामुळे देवळीच्या जनतेच्या आरोग्याची काळजीकडे कंपनीने दुर्लक्ष करावे, तर कंपनीने देवळीकरांच्या आरोग्याची हानी होणार नाही याची काळजी कंपनीने घेणे आवश्यक आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली |

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना उपस्थित केलेल्या आक्षेपांना त्वरित उत्तर देण्याचे निर्देश दिले.

त्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले.

३) **श्री राहूल चोपडा, देवळी, जि.वर्धा.**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की बैठकीत श्री मोहन जोशी यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यानुसार हवा प्रदूषणाबाबत जे मॉनटरिंग करण्यात आले, प्रकल्पापासून देवळी गाव हे फक्त दीड कि.मी. अंतरावर आहे. देवळी गाव हे प्रकल्पाच्या जवळ असल्याने ते हवा प्रदूषणग्रस्त आहे. तर हवा प्रदूषण सर्वेक्षणात देवळी गावाचा हवेचा नमुना (air pollution) का घेण्यात आलेला नाही? याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | त्याचप्रमाणे वृक्षारोपणाबाबत सादरीकरणात मोठे आकडे सांगण्यात आले. येथे एक लाख वृक्षारोपण केल्याचे सादरीकरणात सांगितले. ते आम्ही नाकारत नाही, मात्र ज्या गांभीर्याने वृक्षारोपण करणे गरजेचे होते, त्याप्रमाणे झालेले नाही. यासाठी स्थानिक लोक, स्थानिक अशासकीय संस्था (एनजीओ) यांना सोबत घेऊनच हरितपट्टा विकास कार्यक्रम राबवावा ही मी अनेकवेळा सूचना केलेली आहे. अनेक स्थानिक अशासकीय संस्था (एनजीओ) यांनी वृक्ष संरक्षक (tree guard) ची मागणी केली, मात्र कंपनीकडून ते उपलब्ध करण्यात आले नाहीत. | आम्ही केलेल्या वृक्ष संवर्धनाची नोंद घेण्यात आलेली असून शासनाने निर्देश केलेल्या सर्व आदेशांची वेळोवेळी पूर्तता करण्यात येते. आम्ही आपली जबाबदारी म्हणून वृक्षारोपण पार पाडत असतो. तसेच प्रकल्पात सीईआर (Corporate Environment Responsibility) समिती गठित करणार असून गावातील त्याबाबत विशिष्ट मागणी असल्यास त्याबाबत पूर्तता करण्यात येईल.<br>वृक्षारोपण केले, तर किती जगली व किती राहिली. तर त्यासाठी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगू इच्छितो की देवळी एमआयडीसी व परिसरात कायमस्वरुपी पाण्याची व्यवस्था नाही. तात्पुरते विहिरीचे पाणी देतात व त्यानेच आम्ही झाडांचे संवर्धन करतो. त्यामुळे नुकसान होते. त्यासाठी आम्ही एमआयडीसीत तक्रार केलेली आहे. |
| ३) | दुसरा विषय देवळी हे प्रकल्पग्रस्त गाव आहे. येथील अनेक लोकांच्या जमिनी या देवळी एमआयडीसीमध्ये गेलेल्या आहेत. मी स्वतः प्रकल्पग्रस्त आहे. देवळीकर जनता प्रकल्पाच्या विरुध्द नाही. माझेही हेच म्हणणे | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>सीएसआर निधी बाबत ब-याच उपस्थितांना विचारणा केलेली आहे. तर कार्यरत कंपनी ही जरी तोट्यात असली, तरीही प्रकल्प व्यवस्थापनाने जास्तीतजास्त सीएसआर निधीचा |

| | | |
|---|---|---|
| | आहे की प्रकल्प झाला पाहिजे. आम्ही विकासाच्या विरोधात नाही. येथे कंपनीस सहकार्य करण्याचे धोरण आहे. पण परिसरात ज्याप्रमाणे सीएसआर वापरणे अपेक्षित होते, तसे झालेले नाही. प्रकल्प हा देवळी गाव व परिसरात आहे, मात्र सीएसआर निधी ही वर्धा भागात मोठ्या प्रमाणात वापरला जातो. याबाबत भविष्यात दुजाभाव होऊ नये. | वापर स्थानिक परिसरात केलेला आहे. कुठलीही मागणी आम्ही प्रलंबित ठेवलेली नाही. तरी ज्या गावाची काही मागणी असल्यास शासनाच्या निर्देशांप्रमाणेच ती पूर्ण करण्याचा निश्चितच प्रयत्न करण्यात येईल. |
| ४) | तसेच सामाजीक उपक्रम हे देवळीकर जनतेस सोबत घेऊनच राबविण्यात यावे. जरी सादरीकरणात क्रिडा क्षेत्रात खर्च केल्याचे सांगितले, मात्र प्रत्यक्षात तसे नाही हे कबूल करावे लागेल. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | त्याचप्रमाणे 2,050 व्यक्तींना रोजगार उपलब्ध करण्यात येणार आहे. आपण स्थानिक म्हणजे पूर्ण महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असे आपण स्पष्टीकरण दिलेले आहे. तरी माझी विनंती आहे की कंपनीस्तरावर देवळी ग्रामस्थांसोबत एक समन्वयक समिती गठित करण्यात येऊन देवळी ग्रामस्थांचा प्रकल्पात सहभाग वाढविण्यात यावा, जेणेकरुन देवळी ग्रामस्थांचा रोष कमी होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कामगार आरोग्य व सुरक्षितता याबाबत विविध उपाययोजना करण्यात याव्यात. | प्रकल्पातील एकूण रोजगाराच्या 80% रोजगार स्थानिकांना देणे बंधनकारक आहे. तरीसुध्दा आमचा प्रयत्न हा वर्ध्यातील कर्मचारी मिळविण्याचा प्रयत्न असतो, कारण तो चांगले काम करतो व टिकून राहतो. तसेच प्रस्तावित प्रकल्पात तीन संवर्गातील कर्मचा-यांची आवश्यकता आहे. ती म्हणजे कुशल (Skilled), अर्धकुशल (Semi Skilled) आणि अकुशल (Unskilled). तर ज्याची जशी शैक्षणिक पात्रता असेल, त्यानुसार जास्तीत जास्त प्रकल्प परिसरातील स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात येईल.<br>नविन प्रकल्पात यासाठी एक समन्वयक समिती गठित करण्याचा आमचा मानस असून त्याबाबत देवळी येथील प्रतिष्ठित व्यक्तींसोबत कंपनी प्रशासन चर्चा करेल नविन प्रकल्पात एक समिती गठित करणेबाबत काही सूचना असल्यास त्याबाबत चर्चा करण्यात येईल. |
| ६) | प्रकल्प प्रवर्तक यांनी आरोग्य शिबिराबाबत मुद्दा मांडला. भविष्यात येथे होणारा उर्जा प्रकल्प व वीजनिर्मिती ही कोळशापासून होणार आहे. त्याचा परिणाम देवळी गावक-यांवर होणार आहे. तरी कंपनीने आरोग्याबाबत विशेष लक्ष देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की दुसरी आम्ही मागणी केलेली आहे की देवळी एमआयडीसी ही महाराष्ट्र शासनाचे अधिसूचित (notified) औद्योगिक क्षेत्र आहे. तरी देवळी एमआयडीसीच्या एक किलोमीटर परिघात एन.ए. परवानगी |

| | | |
|---|---|---|
| | | देण्यात येऊ नये, जेणेकरुन स्थानिकांना कुठल्याही प्रदूषणाचा त्रास होणार नाही.<br>देवळी एमआयडीसी ही महाराष्ट्र शासनाचे अधिसूचित (notified) औद्योगिक क्षेत्र असल्याने आम्ही शासनास कर देत असतो. |
| ७) | येथे सांगितले की वसतीगृह विकसित करण्यात येईल, हरितपट्टा 13,000 चौरस फुटावर हरितपट्टा विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रस्तावित अंदाजपत्रकही आपण सांगितले. मात्र असा अनुभव आहे की ते योग्यप्रकारे होत नाही. तरी स्थानिक जिल्हा प्रशासनास विनंती आहे की याबाबत वेळोवेळी तपासणी,देखरेख करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ८) | कंपनीने देवळीचे ग्रामस्थ, रहिवाशी यांच्याशी सलोखा निर्माण करावा. देवळी ग्रामस्थांनी सदरहू प्रकल्पास व एमआयडीसीस सहकार्य केलेले आहे. बैठकीत ग्रामस्थांनी चिमणीबाबत तक्रारी केलेल्या आहेत. मीही चिमणीच्या उंचीबाबत पुराव्यासहित तक्रारी केलेल्या आहेत. माझ्या तक्रारीमुळे कंपनीस शासकीय स्तरावर दंडात्मक कारवाई झालेली आहे. याबाबत कंपनी प्रशासनाने गांभीर्याने काम करणे गरजेचे आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ९) | वा-याच्या दिशेबाबत कंपनी प्रशासनाने माहिती दिली. मात्र माझ्यासकट ब-याच लोकांनी पाहिलेले आहे की रात्री अंधार पडला की आपल्या कंपनीतून धूर बाहेर पडतो. त्यावेळेस चिमण्या का बंद पडतात. याबाबत गांभार्याने लक्ष देण्यात यावे. देवळी ग्रामस्थांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात यावी. प्रशासनाने याबाबत मॉनिटरींग करावे. आपण सादरीकरणात लोकांच्या सहभागाबाबत निवेदन केले,ते फक्त पेपरवर आहे. भविष्यामध्ये जनतेचे सहकार्य मिळेल. पण गरज असलेले काम झाले पाहिजे अशी माझी इच्छा आहे. | बैठकीत आक्षेप नोंदविण्यात आला की कार्यरत प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा ही कार्यक्षम नाही. आम्ही 25 कोटी रुपये खर्च करुन प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित केलेली आहे. शेड़ची रचनासुध्दा बदलली. तरीही याबाबत कोणाचीही काही तक्रार असल्यास त्याचे आम्ही निश्चितच निराकरण करु.<br>आता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग प्रणाली कार्यान्वित करणे बंधनकारक केलेली असून त्याचे एक कनेक्शन हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नवी दिल्ली येथील कार्यालयात व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील कार्यालयात असते. |

| | | |
|---|---|---|
| | | त्यामुळे जर प्रदूषणाची पातळी मानकांपेक्षा जास्त आली, तर संबंधित व्यक्तीस/कारखान्यास त्वरित ऑनलाईन नोटीस जाते. जर आम्ही प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग प्रणाली कार्यान्वित करणे बंधनकारक आहे, तर आम्ही आमची प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कशी बंद करु शकतो. |

४) **श्री किरण ठाकरे, राहणार-देवळी,तालुका, जिल्हा-वर्धाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गेल्या काही वर्षे आम्ही काही लोक प्रदूषणावर काम करत आहोत. प्रदूषणावर काम करताना काही लोक समज करुन घेतात की ही मंडळी कंपनीच्या विरोधात आहेत. तर त्या मूठभर लोकांना महालक्ष्मी प्रसन्न असून ते देवळी गावक-यांच्या आरोग्याशी खेळत आहेत. आमचा कंपनीस विरोध नाही. आमचा विरोध प्रदूषणाला विरोध आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी जो कार्यकारी सारांश येते उपलब्ध करण्यात आला, त्यात सदरहू प्रकल्पामुळे परिसरात भरभराट होईल असे सांगितले. तर ती भरभराट पाहण्यासाठी गावातील लोक जीवंत राहिले पाहिजे. कारण कार्यरत प्रकल्पातील प्रदूषणामुळे या प्रकल्पास परवानगी देण्यात येऊ नये याच मताचा मी आहे. कारण सादरीकरणात प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेवरील खर्च दाखविण्यात आलेला आहे. पण कार्यरत प्रकल्पात प्रदूषण नियंत्रणाबाबत काय केले हा प्रश्न आहे. बैठकीत कार्यरत प्रकल्पातील चिमणीची उंची वाढविण्याची मागणी केली. मात्र तो मुद्दा नाही, कारण कंपनी ही चिमणीतून कमी व प्रकल्पाच्या शेडमधून जास्त धूर सोडते. गेले दहा वर्षे कार्यरत प्रकल्पाबाबत दिलेले आश्वासन | बैठकीत आक्षेप नोंदविण्यात आला की कार्यरत प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा ही कार्यक्षम नाही. आम्ही 25 कोटी रुपये खर्च करुन प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित केलेली आहे. शेड्ची रचनासुध्दा बदलली. तरीही याबाबत कोणाचीही काही तक्रार असल्यास त्याचे आम्ही निश्चितच निराकरण करु.<br>आता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग प्रणाली कार्यान्वित करणे बंधनकारक केलेली असून त्याचे एक कनेक्शन हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नवी दिल्ली येथील कार्यालयात व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील कार्यालयात असते. त्यामुळे जर प्रदूषणाची पातळी मानकांपेक्षा जास्त आली, तर संबंधित व्यक्तीस/कारखान्यास त्वरित ऑनलाईन नोटीस जाते. जर आम्ही प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग प्रणाली कार्यान्वित करणे बंधनकारक आहे, तर आम्ही आमची प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कशी बंद करु शकतो. |

| | | |
|---|---|---|
| | पाळले नाही, तर नविन प्रकल्पाबाबत दिलेले आश्वासन पाळतील याबाबत विश्वास नाही. त्यांनी कार्यरत प्रकल्पात गेले दहा वर्षे धूर नियंत्रण संयंत्रणा (Emission Control System) बसविलेलीच नाही. कार्यरत प्रकल्पातून सोडण्यात आलेला धूर हा संपूर्ण देवळी गावात पसरतो व संपूर्ण देवळी गावात धुक्याचे स्वरुप असते. तरी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती विनंती करण्यात येते की एक आठवडा याबाबत सतत मॉनिटरिंग करुन परिस्थिती पाहण्यात यावी. | |
| २) | येथून देवळी गाव हे एक ते दीड कि.मी. आहे. तर प्रकल्पापासून चारशे मीटरवर असलेले मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतीगृहाचा उल्लेख कार्यकारी सारांश अहवालात नाही. याठिकाणी प्रकल्पापासून एक कि.मी. अंतरावरील ग्रामीण रुग्णालयाचा उल्लेख केलेला नाही. याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | वर्ध्याला जाताना डाव्या बाजूस ऐतिहासिक वृक्षारोपणाचा माहिती फलक आहे. मात्र तेथे एकही झाड नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | बैठकीत सीएसआर निधीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तर सीएसआर निधीतून देवळी गावासाठी किती खर्च केला, सादरीकरणात सांगितले की स्थानिक शैक्षणिक स्तर उंचाविण्यात येईल, तर तो कसा उंचावणार याबाबत काहीही माहिती दिलेली नाही. देवळी गावातील नगरपरिषदेची एकतरी शाळेत डिजिटल टेक्नॉलॉजी आणली का, शाळेच्या इमारतीची दुरुस्ती व देखभाल केली का, याची माहिती नाही. प्रथम कार्यरत प्रकल्पातील प्रदूषण बंद करण्यात यावे. तोच आमचासाठी स्तर उंचावणारा आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५) | आमचा कायम पाठपुरावा असतो की स्थानिकांनाच रोजगार मिळाला पाहिजे. स्थानिक म्हणजे जरी संपूर्ण महाराष्ट्र राज्य आले तरीही ज्या देवळी गावातील लोकांना जमिनी दिल्यामुळे आपला प्रकल्प उभा आहे, तर रोजगारात प्राधान्य देवळी व परिसरातील व्यक्तींनाच देणे आवश्यक आहे. नंतर दुस-या जिल्ह्यातील लोकांना द्या. मात्र आमच्या निरिक्षणानुसार प्रकल्पात सर्व कुशल संवर्गातील कर्मचारी हे परराज्यातील आहे. तर येथील परिसरातील लोकांमध्ये कुशलता नाही का? | याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |
| ६) | तरी प्रस्तावित नविन प्रकल्पात स्थानिक व्यक्तींची कुशलता तपासून त्यांना रोजगाराची संधि देण्यात यावी. तरी देवळी व परिसरातील व्यक्ती जेव्हा नोकरीसाठी अर्ज देण्यास येतील, त्यांना सन्मान देण्यात यावा. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती आहे की सदरहू कार्यरत प्रकल्पास प्रदूषण नियंत्रण करण्याची सक्त ताकीद देण्यात यावी. मी व्यक्तीशः जिल्हाधिकारीसाहेबांना कंपनीच्या प्रदूषणाचे व्हिडिओ पाठविलेले आहेत, एवढे भयानक प्रदूषण कार्यरत प्रकल्पात होत आहे, जसे आपण हिरोशिमा, नागासकीवर अणुबॉम्ब टाकल्यानंतर जसा धूर निघाला, तसेच धुळीचे लोट या कार्यरत प्रकल्पातून बाहेर येत असतात. आम्ही जरी कंपनीच्या विरोधात नाही, तरीही प्रदूषण हे नियंत्रणात आणलेच पाहिजे, स्थानिक परिसरातील लोकांनाच प्रकल्पाच्या रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. कंपनीच्या कार्यरत प्रकल्पातील प्रदूषणामुळे यांच्या नविन प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये याच मताचा मी आहे. कारण आमच्या जीवाशी खेळण्याचा अधिकार तुम्हांला कोणीही दिलेला नाही. बैठकीत आलेली बरीच मंडळी ही वर्ध्याला राहतात, मात्र प्रदूषण आम्ही देवळी ग्रामस्थ व परिसरातील लोक भोगत आहोत. भविष्यात सर्वानाच या प्रदूषणाचे परिणाम भोगावे लागतील. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की किती स्थानिक व्यक्तींना रोजगाराची संधि देण्यात आली हा प्रश्न विचारण्यात आला. तर देवळी संपूर्ण एमआयडीसीत जवळजवळ 10-12 हजार रोजगारांची जरुर आहे. मात्र येथे गेले दहा वर्षात एकही उद्योग आलेला नाही. त्यामुळे येथे 1: 10 हे येथे प्रमाण आहे, म्हणजे एक पदासाठी दहा लोक अर्ज करतात. तरी आमच्या कार्यरत कारखान्यात किती स्थानिक लोकांना रोजगार देण्यात आला त्याचा तक्ता उपलब्ध आहे – प्रकल्पात देवळी येथील – 441, वर्धा येथील – 331, सेलू येथील – 27, आर्वी येथील – 8, हिंगणघाट येथील – 13, कारंजा येथील – 04, समुद्रपूर येथील – 1 असे एकूण 825 व्यक्तींना प्रकल्पात रोजगार देण्यात आला. जर कोणालाही याची प्रत हवी असल्यास ती उपलब्ध करण्यात येईल. तर सामाजीक कार्यकर्त्यांना विनंती करण्यात येते की विविध उद्योग संस्थाना विनंती करण्यात यावी की देवळी येथे उद्योग उभारण्यात यावेत. जर सामाजिक संस्थांनी याबाबत पाठिंबा दिल्यास मी व्यक्तीश त्यास साथ देऊन आपण नविन प्रकल्प आणू शकतो. |

५) शुभांगी खुरजेकर, राहणार- देवळी, तालुका व जिल्हा- वर्धाः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझाही प्रश्न आहे, तो म्हणजे धुळीचे प्रदूषण. माझे गाव कार्यरत प्रकल्पापासून एक ते दीड कि.मी. अंतरावर आहे. आम्ही बाहेर उभे राहिलो तर समोरचा माणूससुध्दा दिसत नाही. आम्ही एवढे प्रदूषण भोगत आहोत, मात्र कंपनी प्रशासनातर्फे या त्रासाबाबत कधिही विचारणा केली जात नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | गावातील ब-याच महिलांना डोळ्यांचा त्रास होतो. आम्हांला सर्वात जास्त त्रास हा प्रदूषणाचा होत असतो. आमच्या निदेर्शनास येते की कंपनीच्या चिमणीतून धूर निघत नाही, तर तो आजूबाजूने निघत असतो. ब-याचवेळा वासाचा त्रास होतो, तर कधितरी प्रकल्पातून आवाज येत असतो.<br>गावातील पुरुष वर्गाबरोबरच आम्ही महिलासुध्दा जागरुक आहोत | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | बैठकीत मागणी केल्यानुसार देवळी व येथील स्थानिक परिसरातील मुला-मुलींनाच प्रकल्प रोजगारात 100% प्राधान्य देण्यात यावे. जर येथील स्थानिक युवक-युवती समजा माझ्याकडे आली की मला कंपनीत रोजगार देत नाहीत, माझ्या अर्जात त्रुटी काढण्यात येतात, तर त्यांनी घेऊन मी कंपनी व्यवस्थापनास भेटण्यास येणार, त्याला न्याय देण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

६) **डॉ.नरेंद्र मदनकर, माजी उपाध्यक्ष, नगर परिषद, देवळी, जि.वर्धा**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे उपस्थित सर्वजण जे काही बोलले, त्या सर्वांनीच सांगितले की आमचा या नविन कारखान्यास विरोध नाही, परंतु महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या सर्व मानकांचे (prescribed standards) कंपनीने तंतोतंत पालन केलेच पाहिजे. जुन्या कारखान्यामुळे जो त्रास होत आहे व अजून नविन कारखाना सुरु केला, तर त्याचाही अजून त्रास सुरु होईल अशी भिती स्थानिक परिसरातील लोकांना वाटत आहे. तो होऊ नये याची काळजी प्रकल्प प्रवर्तकांनी घेतली पाहिजे.<br>दुसरा मुद्दा कार्यकारी सारांश अहवालात उल्लेख आहे की नविन कारखान्यात 2,050 लोकांना रोजगाराची संधि मिळणार आहे. ही खूपच चांगली गोष्ट आहे. पण स्थानिक म्हणून सर्व वर्धा, नंतर विदर्भ व नंतर संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करणार असाल, तर माझे म्हणणे आहे की जमिन आमची, आमच्या शेतक-यांची जमिन आम्ही एमआयडीसीला दिली, आम्ही येथील पाणी देत आहोत, आम्ही प्रदूषणाचा त्रास सहन करत आहोत तर आपण म्हणता दुस-या जिल्ह्यातील लोक घेऊ, तर माझी अशी विनंती आहे की प्रकल्पग्रस्त देवळी व देवळी परिसरातील लोकांनाच रोजगाराच्या संधित प्राधान्य देण्यात यावे. कंपनीस लागणारी विविध कामे ही स्थानिक कंत्राटदारांकडूनच करण्यात यावीत. त्याचप्रमाणे, प्रकल्पात लागणारे तांत्रिक/कुशल कर्मचारी संवर्गात देवळी गाव व परिसरातील युवक युवतींना प्राधान्य देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br><br>प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की किती स्थानिक व्यक्तींना रोजगाराची संधि देण्यात आली हा प्रश्न विचारण्यात आला. तर देवळी संपूर्ण एमआयडीसीत जवळजवळ 10-12 हजार रोजगारांची जरुर आहे. मात्र येथे गेले दहा वर्षात एकही उद्योग आलेला नाही. त्यामुळे येथे 1: 10 हे येथे प्रमाण आहे, म्हणजे एक पदासाठी दहा लोक अर्ज करतात. तरी आमच्या कार्यरत कारखान्यात किती स्थानिक लोकांना रोजगार देण्यात आला त्याचा तक्ता उपलब्ध आहे – प्रकल्पात देवळी येथील – 441, वर्धा येथील – 331, सेलू येथील – 27, आर्वी येथील – 8, हिंगणघाट येथील – 13, कारंजा येथील – 04, समुद्रपूर येथील – 1 असे एकूण 825 व्यक्तींना प्रकल्पात रोजगार देण्यात आला. जर कोणालाही याची प्रत हवी असल्यास ती उपलब्ध करण्यात येईल. तर सामाजीक कार्यकर्त्यांना विनंती करण्यात येते की विविध उद्योग संस्थाना विनंती करण्यात यावी की देवळी येथे उद्योग उभारण्यात यावेत. जर सामाजिक संस्थांनी याबाबत पाठिंबा दिल्यास मी व्यक्तीश त्यास साथ देऊन आपण नविन प्रकल्प आणू शकतो. |

| | | |
|---|---|---|
| २) | त्यांनी पुढे सांगितले की कोविड काळात सदरहू प्रकल्पाने पुष्कळ प्रमाणात मदत केली. मात्र कार्यकारी सारांश अहवालात उल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पाच्या प्रदूषणाचा त्रास ही देवळीकर व देवळी परिसरातील लोकांना कमी कसा होईल याबाबत लक्ष घालण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |
| ३) | त्यांनी पुढे सांगितले की कंपनीने वृक्षारोपण करण्याची जबाबदारी अगदी योग्य प्रकारे पार पाडली आहे. मात्र ती झाडे जगली किती यावर भर दिला पाहिजे. देवळी गाव व परिसर यात असणा-या पडीक, मोकळ्या जागेत झाडे लावून ती झाडे जगवण्याची जबाबदारी स्थानिक लोक व कंपनी यांनी संयुक्तपणे पार पाडली पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |
| ४) | देवळी व परिसरात नगर परिषदेच्या शाळा आहेत, प्राथमिक शाळा आहेत, त्याचप्रमाणे ज्युनिअर कॉलेजस् आहेत, तेथे कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेण्यात यावा. कारखान्यास कोणाचाही विरोध नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या निर्देशांप्रमाणे कंपनीचे काम झाले पाहिजे, एवढीच माझी विनंती आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

७) **<u>श्री निलेश तिडके, राहणार-देवळी, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धाः-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | या परिसरात अजून कंपन्या आल्या, तर येथील देवळी व परिसरातील लोक कंपन्यांना विरोध करणार नाही. कारण लोकांना कामाची गरज आहे. मात्र कंपनी जे सांगते की स्थानिक लोकांना काम देऊ हे पूर्णपणे चुकीचे आहे. कारण सर्वांनाच येथे काम करणे जरी आवडणार नाही, पण कंपनी येथील | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिकांना काम देतच नाही. मात्र अगोदर कार्यरत प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रणात आणण्यात यावेत. | |
| २) | त्याचप्रमाणे कार्यरत प्रकल्पातील प्रदूषणाबाबत स्थानिक प्रशासनास ब-याचवेळी निवेदने दिलेली आहेत. त्यावर कार्यवाही झालेली नाही. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती आहे की कंपनीच्या कार्यरत प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण करण्यात यावे. | याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

८) **<u>श्री कृष्णकांत शेंडे, राहणार-देवळी, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धाः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे देवळी व देवळी परिसरातील लोकांनी ज्या भावना व्यक्त केल्या, त्या अत्यंत महत्वाच्या आहेत. सर्वांनीच भावना व्यक्त केली की सदरहू कंपनी ही प्रदूषण नियंत्रण करण्यास वेळकाढूपणा करत आहे. सर्वांच्या भावना आहेत की ही नविन कंपनी झाली पाहिजे, येथील देवळी व परिसरातील युवक युवतींनी रोजगाराची संधी मिळाली पाहिजे. स्थानिक म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र जर होत असेल, तर येथील भूमीपुत्रांना कंपनीतील सर्व कुशल, अर्धकुशल व अकुशल संवर्गात 50% टक्के रोजगारात संधी देण्यात आली पाहिजे. त्यामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात, पानपट्टी, चहाचे दुकान, मोबाईल रिपेअरिंग दुकाने इ. मोठ्या प्रमाणात वाढ होईल. | सूचनेची नोंद घेण्यात आली. हवा प्रदूषणाबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |
| २) | त्याचबरोबर कंपनीने स्थानिक देवळी गाव व परिसरातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे. तरी नविन कंपनी सुरु करण्यास आमचे समर्थन आहे, मात्र कंपनीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेले सर्व निकषांचे तंतोतंत पालन करावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

९) **श्री अनिल क्षिरसागर, राहणार-देवळी,तालुका-देवळी, जिल्हा-वर्धाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | माझा कंपनीस काहीही विरोध नाही. मात्र आरोग्याच्या दृष्टीने येथील स्थानिक डॉक्टरांकडील रुग्णांचे सर्वेक्षण/माहिती करण्यात यावी. येथे लहान मुलांपासून वृध्दांपर्यंत दम्याची रुग्ण सर्वात जास्त आहेत. कारण कार्यरत प्रकल्पातील कमी उंचीच्या चिमणीमुळे सगळीकडे धूर पसरत आहे. जिल्हा प्रशासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास वारंवार निवेदने, तक्रार करुन त्यांच्याकडून कंपनीवर कुठलीही कारवाई होत नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br><br>आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की नियमांचे उल्लंघन झाले म्हणून नुकतीच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनीची रुपये पाच लाखाची बँक गॅरन्टी ही जप्त केलेली आहे. मे, 2023 ला कारण दाखवा नोटीस कंपनीला देण्यात आलेली आहे. तर प्रदूषण नियमांची अंमलबजावणी व त्यांनतर पुढील सर्व प्रक्रिया ही सतत करण्यात येणारी कार्यवाही आहे. |
| २) | कंपनीचे अधिकारी हे वर्ध्याला राहतात. त्यामुळे त्यांनी देवळी ग्रामस्थांना कंपनीच्या धुरामुळे काय त्रास होतो हे कळत नाही. देवळी गावातील लहान मुले व वृध्द माणसे यांची कंपनीच्या धुरामुळे काय अवस्था होते हे जाणून घ्या. तसेच पर्यावरणविषयक समितीस विनंती करतो की त्यांनी येते एक ते दोन महिने राहून बघावे. पांढरा शर्ट,कपडा बाहेर टाकला तर सकाळी तो काळा होऊन जातो. कार्यरत प्रकल्पात जे प्रदूषण होत आहे, ते प्रथम नियंत्रणात आणण्यात यावे. माझा कंपनीस विरोध नाही. बेरोजगारांना कंपनीमुळे रोजगार मिळेल. येथील देवळी गाव व परिसरातील लोकांनाचे नोक-या देण्यात याव्यात. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की हवा प्रदूषण नियंत्रणाबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

१०) **श्री अजिंक्य तांभेकर, राहणार-देवळी, तालुका -देवळी, जिल्हा-वर्धाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी प्रशासनाने सांगितले की प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात आलेली आहे. तर कार्यरत प्रकल्पात किती स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात आली, नविन प्रकल्पात किती स्थानिक लोकांना रोजगाराची संधी देण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. | उत्तर देण्यात आलेले आहे. |
| २) | सादरीकरणात एक लाख झाडे लावले असे प्रतिपादन करण्यात आले. ते अमान्य करत नाही, मात्र तेथील राहणा-या लोकांना ते झाडे तरी दिसले पाहिजे.<br>कंपनीने सांगितले की प्रकल्पात कुशल (skilled) कामगारांची आवश्यकता आहे. तर कंपनीकडून गेले 10-15 वर्षात किती कौशल्यविकास प्रशिक्षण आयोजित करण्यात आले? स्थानिक युवक युवती यांच्यामधे कौशल्य विकसित करण्यासाठी कौशल्य अभ्यासक्रम वेळोवेळी राबविण्याकडे लक्ष देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली, याबाबत अगोदरच उत्तर देण्यात आलेली आहे. |
| ३) | तसेच स्थानिक युवक-युवती यांनी कंपनीस नोकरीसाठी अर्ज केल्यानंतर त्यांना पुढील केलेली कार्यवाही कळविण्यात यावी. तसेच बैठकीत उपस्थित मुद्द्यांवर लक्ष द्यावे ही विनंती. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

११) **श्री प्रविण कात्रे, राहणार-देवळी, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जरी स्थानिकांना रोजगार मिळणे हा मुद्दा महत्वाचा आहेच, तरीही ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविणे, त्याविषयांवरच बोलणे अपेक्षित आहे. मात्र या जनसुनावणी आयोजनास माझा आक्षेप आहे. कारण जन म्हणजे लोक, तर येथील लोकांना आज ही सुनावणी आहे याची माहिती नाही. गावामधून रिक्षावर लाऊडस्पिकर लावून लोकांना माहिती देण्यात आलेली नाही. पेपरात छोटीशी जाहिरात देण्यात येते, तो पेपर नागरिकांच्यादृष्टीस पडला नाही तर माहितसुध्दा कळत नाही. आम्ही सामाजिक क्षेत्रात काम करतो, म्हणून आमच्यासारख्या काही लोकांना माहिती मिळाली, म्हणून आम्ही आलो. मात्र कार्यरत प्रकल्पातील प्रदूषणामुळे जे त्रस्त आहेत, त्या लोकांना आजच्या बैठकीची माहिती नाही,त्यामुळे ते लोक येथे येऊ शकले नाही. कंपनीला लागूनच असणा-या वसाहतीतील 3-4 लहान मुले ही कंपनीच्या धुरामुळे दम्याचे रोगी झालेले आहेत. त्या वसाहतीतील लोकांनाही या जनसुनावणीची माहिती नाही. | आयोजक,पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, 2006 नुसार जाहिर जाहिर जनसुनावणी तारखेच्या 30 दिवस अगोदर एक स्थानिक वृत्तपत्रात मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्लिज भाषेत जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. शिवाय जनसुनावणी तारखेत बदल झाल्यानंतरही त्याची जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे बाधित ग्रामपंचायत कार्यालये तसेच अधिसूचित शासकीय कार्यालयात संबंधित प्रकल्पाचा संपूर्ण दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होता व संबंधितांना विभागांना व ग्रामपंचायत कार्यालयांना याबाबत सूचना करण्यात आलेल्या होत्या. ईआयए अधिसूचनेचे तंतोतंत पालन करण्यात आलेले होते. |
| २) | प्रकल्पाने कार्यकारी सारांश अहवाल हा उपलब्ध केलेला होता, त्या ब-याच गोष्टी या लपवून ठेवण्यात आलेल्या आहेत. कंपनीच्या जवळच मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह आहे. तेथे पाचवीपासून पदवीपर्यंत सुमारे 120 मुले राहतात. त्या मुलांनी ब-याचवेळा मला तक्रार केली या कंपनीच्या धुरामुळे येथे राहणे शक्य नाही. आम्ही कंपनीस विचारायला गेलो तर कंपनी | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आमच्यावर खोटे रिपोर्ट देऊन पोलिस कारवाई करते. | |
| ३) | तसेच कंपनीच्या जवळ रस्त्याच्या दुस-या बाजूस ग्रामीण रुग्णालय आहे. त्याचाही उल्लेख कार्यकारी सारांश अहवालात नाही. तेथे बरेच रुग्ण येत असतात. त्यांनाही कंपनीच्या धुराचा प्रचंड त्रास आहे. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती आहे की कार्यरत प्रकल्पास तंबी देण्यात यावी व प्रथम जुन्या प्रकल्पातील प्रदूषण प्रथम थांबवा, नंतरच नवीन प्रकल्पास मान्यता मिळेल. सादरीकरणात नविन प्रकल्पाबाबतची पर्यावरण व्यवस्थापन योजना जी दर्शविली, ती प्रथम जुन्या प्रकल्पात प्रथम राबविण्यात यावी. सादरीकरण एवढ्या वेगात सांगितले की ब-याच उपस्थित लोकांना काहीही समजले नाही. सादरीकरणात ब-याच गोष्टी साफ खोट्या आहेत. हरितपट्टा विकसित केला हे पूर्णपणे खोटे आहे. करोना काळात पडेगावला हॉस्पिटल बांधले हे खोटे आहे, ते हॉस्पिटल नव्हते, तर ती त्तात्पुरती निवारा व्यवस्था होती. ते विलगीकरण केंद्र (Quarantine Center) होते. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | त्यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पात स्थानिकांना रोजगार देण्यात येत नाही. महाराष्ट्र शासनाचा नियम आहे की प्रकल्पात 80% रोजगार हा स्थानिकांनाच देण्यात यावा. येथे स्थानिक म्हणजे देवळी गाव व देवळी परिसरातील लोक. स्थानिक म्हणजे येथील भूमीपुत्र, ज्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात आल्या, स्थानिक म्हणजे प्रकल्प परिसरातील लोक जे प्रकल्पातील प्रदूषणामुळे त्रस्त आहेत. तर या लोकांना आपण स्थानिक या व्याख्येत बसविले पाहिजे, जरी महाराष्ट्र राज्याची स्थानिक म्हणजे महाराष्ट्रातील रहिवाशी असा आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की याबाबत उत्तर देण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| ५) | स्थानिकांचे निरिक्षण असे आहे की शासकीय वेळेत म्हणजे 11 ते 5 वाजता कंपनीतील धुर सोडण्याचे प्रमाण हे कमी असते. मात्र संध्याकाळी पाच नंतर म्हणजे शासकीय कार्यालये बंद होताना, सणाच्या सुटीच्या दिवशी, शनिवारी, रविवारी कंपनीतून प्रचंड प्रमाणात धूर सोडला जातो. यामुळे देवळी व परिसरात दमा, डोळ्यांचे आजार, त्वचेचे आजार यामुळे स्थानिक लोक बेजार आहेत आणि डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार या कंपनीच्या प्रदूषणामुळे या आजारात 30% वाढ झालेली आहे. काही महिन्यांपूर्वी एक शिबिर घेतलेले होते, त्यात 40% लोक हे दमा, अस्थमा, डोळ्यांचे आजार, त्वचा रोगाचे रुग्ण होते. ते या कंपनीच्या प्रदूषणामुळे. कंपनी लगतच्या वसाहतीतील जर तीन मुले आली असती, तर स्थानिकांना काय त्रास होतो हे कळले असते. | बैठकीत आक्षेप नोंदविण्यात आला की कार्यरत प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा ही कार्यक्षम नाही. आम्ही 25 कोटी रुपये खर्च करुन प्रदूषण नियंत्रम सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित केलेली आहे. शेड्ची रचनासुध्दा बदलली. तरीही याबाबत कोणाचीही काही तक्रार असल्यास त्याचे आम्ही निश्चितच निराकरण करु.<br><br>आता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग प्रणाली कार्यान्वित करणे बंधनकारक केलेली असून त्याचे एक कनेक्शन हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नवी दिल्ली येथील कार्यालयात व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील कार्यालयात असते. त्यामुळे जर प्रदूषणाची पातळी मानकांपेक्षा जास्त आली, तर संबंधित व्यक्तीस/कारखान्यास त्वरित ऑनलाईन नोटीस जाते. जर आम्ही प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग प्रणाली कार्यान्वित करणे बंधनकारक आहे, तर आम्ही आमची प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कशी बंद करु शकतो. |
| ६) | कंपनीतील धुरामुळे परिसरातील शेकडो एकर जमिनीतील पीकांवर परिणाम झालेला आहे. येथील शेतजमिनीच्या उत्पादन देण्याच्या क्षमतेत 50-60% घट झालेली आहे. पीकाच्या पानावर, पीकांवर धुळ पडते, त्यामुळे त्यास ऑक्सीजन मिळत नाही, म्हणून त्याची वाढ होत नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ७) | कंपनीतील उत्पादनास जे पाणी लागते, ते 15-20 टँकरव्दारे दिवसभर वेगवेगळ्या ठिकाणाहून आणले जातात. दिवसभर कंपनीचे टँकर हे पाणी आणून येथे टाकत असतात. त्यामुळे परिसरातील पाण्याची पातळी ही खालावली आहे. टँकरवाले हे पाणी विकून श्रीमंत झालेले आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ८) | तरी माझी विनंती आहे की प्रथम कार्यरत प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण करण्याचे आदेश देण्यात यावेत, नंतरच नविन प्रकल्पास परवानगी देण्यास काहीही हरकत नाही. | याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

१२) **श्री अमोल आखोड, सरपंच, ग्रामपंचायत चिकनी, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | 46/2 हा सर्व्हे नंबर माझ्या भावाचा आहे, म्हणजे 7/12 माझ्या गावाचा आहे. 10-12 वर्षे झाली कंपनी येऊन पण माझ्या गावाला अजूनपर्यत टॅक्स मिळालेला नाही. याबाबत स्पष्टीकरण. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | नवीन प्रकल्पातील सीएसआर निधी गावासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याचप्रमाणे माझ्या गावातील 50-60 मुलांना नविन प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१३) **श्री प्रणय कदम, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष, वर्धाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे दोन मुद्दे आहेत. बैठकीत आतापर्यंत हवा प्रदूषणाविषयीच बोलले. मात्र उत्पादन प्रक्रियेमुळे निर्माण होणारे जल प्रदूषण आणि घातक घनकचरा (Hazardous Solid Waste) यावर प्रक्रिया, हाताळणी व विल्हेवाट कशाप्रकारे लावण्यात येईल याचे स्पष्टीकरण. ती झाल्यानंतरच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदरहू प्रकल्पास परवानगी द्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१४) **श्री सचिन काळे, सरपंच, तेंतुरा ग्रामपंचायत, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धा:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या गावातील 50-70 लोक येथे कार्यरत आहेत. माझा या प्रकल्पास विरोध नाही. मात्र प्रकल्पातील प्रदूषणाचा त्रास परिसरातील लोकांना होऊ नये याची कंपनीने दक्षता घ्यावी. प्रकल्पाचा जो सीएसआर निधी आहे, तो विकास कामांना उपलब्ध करुन द्यावा व गावातील 50-60 मुलांना रोजगार उत्पन्न करुन द्यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१५) **श्री सुनंदा रेड्डा, पर्यावरणवादी, हैद्राबाद –**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प व्यवस्थापन आणि ग्रामस्थांना माझ्या शुभेच्छा. औद्योगिक विकासाला पाठिंबा देणारा मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे. एक व्यावहारिक पर्यावरणवादी म्हणून, मी ६७ वर्षांचा आहे आणि माझ्या ४० वर्षांच्या पर्यावरणीय पैलूच्या अनुभवासह भारतातील सर्वात निरोगी पर्यावरणवाद्यांपैकी एक आहे. माझ्या मते बेरोजगारी हे समाजाचे मोठे प्रदूषण आहे. ३९४ कोटी खर्च करून २,०५० रोजगार उपलब्ध करून दिल्याबद्दल मी उद्योग व्यवस्थापनाचे अभिनंदन करतो. मी भारतभर निरीक्षण केले आहे, एक रोजगार ४-५ कोटी खर्चून बेरोजगारी देतो, इथे एक कोटी खर्च करून सहा जणांना रोजगार मिळतो, मी कौतुक करतो. तसेच ४-५ हजारांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून देत आहे. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| २) | या उद्योगाच्या उत्पादनामुळे १३००० लोकांना, ३५,००० पर्यंत अप्रत्यक्ष रोजगार, जे काही साहित्य वापरले जाते. मी उद्योगांना काही सूचना देत आहे -<br>व्यवस्थापनाने एमआयडीसी परिसरात उद्योग उभारण्याचे नियोजन केले आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये, एमआयडीसीच्या बाहेरील औद्योगिक विभागांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. निवडीसाठी ही चांगली संधी आहे. तसेच हा रोजगार देणारा उद्योग आहे. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |
| ३) | मी सरकारला विनंती करत आहे. भारत सरकारने औद्योगिक कचरा साहित्य गोळा करण्यासाठी योजना आखावी.<br>शहरे, नगरपालिका, नगर पंचायतींमध्ये स्थानिक संस्थांकडून कचरा उचलला जातो. उद्योगातून कचरा गोळा केला तर रोजंदारीवर रोजगार देण्यासाठी उद्योगाला सर्वाधिक वाव आहे.<br>आता पर्यावरणाच्या दृष्टीने - तुमच्या उद्योग क्षेत्राला एका वर्षात ३०-४० क्युसेस पावसाचे पाणी मिळते. कृपया भूगर्भातील पाण्याची पातळी सुधारण्यासाठी वॉटर हार्वेस्टिंग स्टोअर्स बांधा, जे सर्वात महत्त्वाचे आहे, बाहेरून पाणी आणू नये. पाण्याची साठवण करणे फार महत्वाचे आहे. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |
| ४) | कोरोनाने आपल्याला खूप चांगला धडा दिला आहे. वृक्षारोपण खूप महत्वाचे आहे. ३३% अनिवार्य आहे. सरकारी विभागांसह, 50% प्रकल्पाच्या बाहेर वृक्षारोपणाची योजना करा. वृक्षारोपणात, कृपया औषधी मूल्याची झाडे आणि फळे देणारी झाडे लावा जी सर्वात महत्वाची आहेत. | हरित पट्टा विकसित करताना तेथे औषधी वनस्पती व फळांची झाडे लावण्याची मागणी करण्यात आली.<br>याबाबत नुकतीच स्थानिक दवाखान्यातून आमच्याकडे मागणी आलेली आहे की त्यांनी काही विशिष्ट प्रजातीची झाडे आवश्यक असल्याने ती उपलब्ध करण्यात यावीत. तरी पुढील 3-4 महिन्यात त्यांच्या देवळी येथील दवाखान्यात प्रकल्पाकडून औषधी वनस्पती पुरविण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| ५) | तसेच कौशल्य विकास देखील खूप महत्वाचा आहे. स्थानिक तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण, कौशल्य विकसित तरुणांना या उद्योगात नोकरी मिळू शकते, उर्वरित इतर उद्योगांमध्ये मिळेल. शासनाच्या मदतीने कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात यावा. CSR बजेटसाठी तुम्ही जो काही खर्च करणार आहात, कृपया गावकऱ्यांची एक समन्वय समिती तयार करा. एमपीसीबीचे अधिकारी, गावकरी, उद्योगांचे प्रतिनिधी इ. गावकऱ्यांसाठी लक्ष्याभिमुखं कामापेक्षा मागणीनुसार काम करण्यात यावे. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |
| ६) | सविस्तर पर्यावरण सर्वेक्षण केल्याबद्दल मी तुमच्या सल्लागाराचे अभिनंदन करतो. शेवटी मी पर्यावरणीय सुरक्षा आणि औद्योगिक सुरक्षिततेसाठी विनंती करतो. उद्योगाला बिनशर्त संमती देण्याचे आवाहन करणारा मी पहिला पर्यावरणवादी आहे. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

आयोजक यांनी उपस्थिताना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

१६) **<u>श्री संदीप किटे, अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, वर्धा-</u>**

| अनु. क्रं. | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आमच्या वर्धा जिल्हा हा मागासलेला जिल्हा असल्याने व म. गांधीचा हा जिल्हा असल्याने येथे मोठ्या कंपन्या येत नाहीत. त्यामुळे जिल्ह्यात रोजगार निर्मिती होत नाही. माझा प्रकल्पांना तीळमात्र विरोध नाही. मात्र व्यक्तीशः या महालक्ष्मी प्रकल्पास विरोध आहे. कारण कंपनीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेले मापदंड पाळत नाही. येथे उपस्थितांनी कार्यरत प्रकल्पाच्या प्रदूषणाविषयी बरेच | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | तक्रारी,आक्षेप नोंदविलेले आहेत. येथे उपस्थितांना सांगितले की प्रकल्पातील धूळीमुळे येथे 30% दमा, त्वचा रोग, डोळे जळजळणे याचे प्रमाण वाढलेले आहे. चिमणीची उंची ही पारित निर्देशांपेक्षा खूपच कमी आहे. वर्धा जिल्ह्यात सर्वात जास्त प्रदूषणकारी कंपनी ही महालक्ष्मी आहे. | |
| २) | तरी कार्यरत महालक्ष्मी कंपनीने प्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेली मानकांचे पालन करावे. त्यानंतर नविन प्रकल्पास मान्यता देण्यात यावी. आमचा कुठल्याही प्रकारे प्रकल्पास विरोध नाही. येथे प्रकल्पाच्या बाजूस महाविद्यालय आहे. तिथल्या मुलांना त्रास होतो. कंपनीच्या धुरामुळे येथील नागरिकांना त्रास होतो. तरी प्रथम कार्यरत प्रकल्पातील प्रदूषण हे थांबविण्यात यावे व नंतर नविन प्रकल्पास मान्यता देण्यात यावी. | याबाबत अगोदर उत्तर देण्यात आलेले आहे. उर्वरित सूचनांची नोंद घेण्यात आली. |

१७) **<u>श्री गजानन दुतारे, राहणार-दहेगांव स्टेशन, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धाः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझा एकच प्रश्न आहे की माझ्या गावातील लोकांना रोजगार मिळावा. तसेच आमच्या ग्रामपंचायतीस सीएसार निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. | प्रकल्प परिसरातील लोकांनाचे त्यांच्या शैक्षणिक |

यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की बैठकीत जे मुद्दे उपस्थित करण्यात आले, त्यापेक्षा वेगळे मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावे. जेणेकरुन प्रकल्प प्रवर्तकांना एकत्रित उत्तर देता येईल.

१८)　**श्री चंद्रशेखर, पर्यावरणवादी,तेलंगणाः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | एसएमडब्लु इस्पात या कंपनीच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत मी सूचना करतो की कंपनीने हरित पट्टा विकसित करावा, स्थानिक गावातील सामाजिक कार्यासाठी सीएसआर निधी वापरण्यात यावा. प्रकल्प परिसरातील लोकांना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी. प्रकल्पातील ईटीपी हा वेळोवेळी सक्षम करण्यात यावा. कामगारांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यात यावी. मी भारत सरकारला सदरहू प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची विनंती करतो. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

१९)　**श्री हरिदास धोप, लोकमत पत्रकार, जि.वर्धा.**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | ही देवळी एमआयडीसी 750 एकरात उभी राहिलेली आहे. 29 वर्षापूर्वी पायाभरणी करण्यात आली. या 29 वर्षात येथे 108 भूखंड पडलेले आहेत. ब-याच उद्योगजकांनी भूखंड नुसतेच अधिग्रहित केलेले आहेत. शेतक-यांची लाख मोलाची जमिन घेण्यात आलेली आहे. काहींचे बांधकाम चालू आहे. या परिसरात उद्योगधंदे यावेत,येथील लोकांना रोजगार मिळावा, येथील परिसर सुजलाम, सुफलाम व्हावा यासाठी ही एमआयडीसी उभारण्यात आली. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | तरी शासनास, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती आहे की सदरहू प्रकल्पास कडक अटी व शर्तीसह | याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मंजुरी देण्यात. या प्रकल्पामुळे प्रदूषण होऊनये म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून विशेष लक्ष ठेवण्यात यावे. जिल्हाधिकारी-वर्धा या कार्यालयाने याबाबत लक्ष ठेवावे. | |
| ३) | ब-याच लोकांनी सांगितले की आमचा या प्रकल्पास विरोध नाही. येथील लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. देवळी गाव व परिसरातील ज्यांच्या जमिनी अधिगृहित करण्यात आल्या, ते प्रकल्पग्रस्त असून त्यांना या प्रकल्पात रोजगाराची संधि ही प्राधान्याने देण्यात आली पाहिजे, ही विनंती करतो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की नियमांचे उल्लंघन झाले म्हणून नुकतीच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनीची रुपये पाच लाखाची बँक गॅरन्टी ही जप्त केलेली आहे. मे, 2023 ला कारणे दाखवा नोटीस कंपनीला देण्यात आलेली आहे. तर प्रदूषण नियमांची अंमलबजावणी व त्यांनतर पुढील सर्व प्रक्रिया ही सतत करण्यात येणारी कार्यवाही आहे. आयोजक यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पातील द्वितीय प्रकल्पात (सेकंडरी प्लॅन्ट) सुधारणा/विकसन करण्यात यावे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की सदरहू कारखाना हा महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचित औद्योगिक क्षेत्रात असून कारखान्याने हरितपट्टा विकसनाबाबत जास्त काम करण्याची गरज आहे. औद्योगिक क्षेत्र व निवासी क्षेत्र यामध्ये फारकत करुन स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात यावी. त्याचप्रमाणे जिल्हा नियोजन प्राधिकरणाचे (District Planning Authority) सर्व निर्देश कंपनीने व एमआयडीसीने पाळलेच पाहिजेत. उपस्थितांनी कार्यरत प्रकल्पाच्या प्रदूषणाविषयी बरेच आक्षेप व नाराजी व्यक्त केलेली आहे. तर कंपनीने त्याबाबत अतिशय काळजीपूर्वक व कार्यक्षमतेने प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा सतत कार्यान्वित ठेवणे व भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्देश पाळणे आवश्यक आहे. बफर झोनबाबत सर्वांनी नियम पाळणे, त्याबाबत लक्ष सर्वांनीच ठेवणे आवश्यक आहे.

आयोजक यांनी उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले, त्याचप्रमाणे लेखी सूचना, आक्षेप असल्यास तेपण सादर करण्याचे आदेश दिले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. त्यांनी अध्यक्षा यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की आज आपण प्रकल्प प्रवर्तक मे. एसएमडब्ल्यू इस्पात प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.बी-1/2, बी-1/3, बी-1/4, आर-2 व आर-3, एमआयडीसी देवळी, सर्व्हे नं.एसआर-46/2, 562, 564, 565, तालुका-देवळी, जिल्हा-वर्धा, महाराष्ट्र येथे 2X1000 टन प्रतीदिन आयर्न ओअर पेलेट प्लांट सोबत 26,000 घनमीटर प्रति तासाचा कोल गॅसिफायर स्पॉन्ज आयर्न प्लांट (2 X500 टन प्रतीदिन) व 50 मेगावॅट सीपीपी(25 मेगावॅट डब्लुएचआरबी + 25 मेगावॅट एएफबीसी) वीज प्रकल्प विस्तारिकरण उत्पादन प्रकल्पाच्या उभारणीच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठी एकत्र जमलेलो आहोत.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की जरी सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी होती, तरीही बैठकीत स्थानिकांनी रोजगाराबाबत सूचना, आक्षेप नोंदविल्या आहेत, त्याचप्रमाणे स्थानिकांचा सीएसआर निधीबाबत रोष आढळून आलेला आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीच्या सुरवातीसच प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यामुळे ही समिती येथे कुठलाची निर्णय घेत नसते.

बैठकीची व्हिडिओ शुटीगसुध्दा तयार करण्यात आलेली आहे अध्यक्षा यांनी उपस्थितांना काही शंका, सूचना, आक्षेप नोंदवायचे असल्यास त्याबाबत विचारणा केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्षा यांनी उपस्थितांची सूचना, आक्षेप नाही असे दिसते असे मत मांडून जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षा यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

**(अतुल सातफळे)**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर

**(सौ. हेमा देशपांडे)**
सदस्या,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर

**(सौ. अर्चना मोरे)**
अध्यक्षा
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,वर्धा जिल्हा-वर्धा